परिविक्षा कालावधी समाप्त करणेबाबत...
डॉ. प्रविण रामदास वानखडे ,
वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१,
ग्रामीण रुग्णालय,देऊळगाव राजा,
जि. बुलढाणा.

## आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

आदेश.क्र.आसेआ/कक्ष-१/टे-५/परिवि आदेश-२०२६/डॉ.वानखडे/ ९२३४-६३ /२६
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई -०१
दिनांक - ९/४/२०२६ मार्च, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/आठ, दि.२९/०२/२०१६.
२) शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क. परिवि-२०१८/प्र.क.२/आठ, दि०७/०२/२०१८.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. परिवी-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि. २५/०८/१०२५.
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. नामनि-१४२२/प्र.क्र.४१३/सेवा-२, दि.२८/०४/२०२३.
५) उपसंचालक,आरोग्य सेवा, अकोला मंडळ,अकोला यांचे पत्र जा.क्र./आस्था-५/परिविक्षाकासप्रस्तास-प्रस्तावा / ३५२९४-९६/२५,दि.३०.०९.२०२५.
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. संकिर्ण २०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि. ०९/०२/२०२६.

## आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार डॉ. प्रविण रामदास वानखडे यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील "वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय देऊळगाव राजा, बुलढाणा "गट-अ या पदावर दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता संदर्भीय दि. २८/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत नियुक्ती करण्यात आली आहे.

२. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांनी संदर्भीय दि. ३०.०९.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील "वैद्यकीय अधिक्षक " वर्ग-१, ग्रामीण रुग्णालय देऊळगाव राजा, जि.बुलढाणा या पदावर पदस्थापना दिलेल्या डॉ. प्रविण वानखडे यांनी त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असल्याने, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची बाब आयुक्तालयाच्या विचारधीन होती.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ, गधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील डॉ. प्रविण वानखडे , वैद्यकीय अधिक्षक, गट-अ यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने संदर्भीय शासन निर्णय अन्वये विहीत केलेल्या आवश्यक बाबी समाधानकारका-रित्या पूर्ण केलेल्या असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी खालील तकत्यात दर्शविलेल्या स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास (म.न.) समाप्त करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव | कार्यालय | "वैद्यकीय अधिक्षक " पदावरी रुजु दिनांक | परिविक्षाधिन कालावधी समाप्त केलेल्याचा दिनांक | परिविक्षाधिन कालावधी पुढे ढकलण्याची कारणे | "वैद्यकीय अधिक्षक" पदावरील सेवा नियमितपणे पुढे चालु ठेवण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | डॉ. प्रविण रामदास वानखडे | "वैद्यकीय अधिक्षक "वर्ग-१, ग्रामीण रुग्णालय , देऊळगाव राजा, जि. बुलढाणा. | दि.११.०५.२०२३ (म.पू.) | दि.१०.०५.२०२५ (म.नं.) | निरंक | दि. ११.०५.२०२५ |

२. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना कळविण्यात येते की, डॉ. प्रविण रामदास वानखडे, वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, देऊळगाव राज , बुलढाणा गट-अ यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतुदीनुसार मुक्त करण्याच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करावी.

३. शासन पत्र क्रं. संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि. ०९/०२/२०२६ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यरत एस-२० व त्यावरील संवर्गातील अधिकारी यांचे परिविक्षा कालावधी समाप्ती करण्याबाबतचे अधिकार सामान्य प्रशासन विभाग दि. २२.०६.२०२१ मधील अटी व शर्ती विहीत परिविक्षा कालावधीत पूर्ण करणा-या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचे अधिकार आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांना प्रत्यावर्तीत केल्यानुसार सदर आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

हे आदेश आयुक्तालयाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आले आहेत.

( मा.आयुक्त यांच्या मान्यतेने )

( राजेंद्र भालेराव )
सहसंचालक, ( प्रशासन )
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

प्रत - उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
प्रत - जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा. .
प्रत - महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता ) -२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
प्रत - महालेखापाल, लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र , मुंबई/ नागपूर
प्रत - जिल्हा कोषागार अधिकारी ,अकोला/ बुलढाणा
प्रत - डॉ. प्रविण रामदास वानखडे,वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय देऊळगाव राजा, जि. बुलढाणा.
प्रत - निवडनस्ती ( कार्यासन - १)